# डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २३४ /२०२५ दि. ०९/०७/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** डोंबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीतील ठाकुर्ली ब्रिज पुर्वेस जोशी हायस्कुल समोर उतरल्यानंतर ठाकुर्ली स्टेशनकडे जाणारा नेहरू रोड हा एकदिशा मार्ग असुन नेहरू रोड व वल्लभभाई पटेल मार्गावरून नेहरू रोड मार्गे ठाकुर्ली स्टेशन कडे जाण्यास प्रवेश बंदी आहे.

तसेच वल्लभभाई पटेल मार्गावर जोशी हायस्कुल समोर सद्गुरू निवास को. ऑप हौ. सोसायटीच्या बाजुस असणारा अरूंद बापु दातार मार्ग हा अरूंद असुन सदर रस्त्याने सध्या दुतर्फा वाहतुक होत असल्याने ठाकुर्ली स्टेशनकडुन येणारी व नेहरू रोड व वल्लभभाई पटेल मार्गावरून जाणारी वाहने समोरासमोर येतात. त्या ठिकाणी वळणावर रस्ता अरूंद असल्याने समोरासमोर आलेल्या वाहनांमुळे वाहतुक कोंडी होते व अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद** – डोंबिवली पुर्व येथील व्ही पी रोड वरील जोशी हायस्कुल समोर सद्गुरू निवास को. ऑप हौ. सोसायटीच्या बाजुस बापु दातार रोड मार्गे ठाकुर्ली पुर्व स्टेशनकडे जाणाऱ्या वाहनांना **बापु दातार रोड कट, सद्गुरू निवास को. ऑप हौ. सोसायटीच्या बाजुस 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदरची वाहने सरळ वल्लभभाई पटेल मार्गाने पुढे जावुन नाना कानविंदे चौकातुन डावीकडे वळण घेवुन पंचायत बावडी मार्गे अथवा व्ही. पी. रोड मंजुनाथ शाळा कट, कल्याण रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्या तारखेपासुन ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागु करण्यात येत आहे. काही हरकत अगर सुचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा, कार्यालय, तीन हात नाका, एल.बी. एस.मार्ग, ठाणे.४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची अधिसुचना पुढील आदेश होई पावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे

CamScanner

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.
<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.
<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
<u>प्रत</u> :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner

बापु दातार कट - श्री गुंडी नाकाशी
र.प. रोड, डोंबिवली (पूर्व)

